Impact Factor-8.632 (SJIF)        ISSN-2278-9308

# B.Aadhar


Single Blind Peer-Reviewed & Refereed Indexed

**Multidisciplinary International Research Journal**

March- 2024

ISSUE No - (CDLXIII) 463

## 75th Years of Indian Economy: Achievements and Challenges




**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Executive Editor**
Dr. R. K. Shanediwan
Principal
Shri Shahaji Chhatrapati
Mahavidyalaya, Kolhapur

**Editor**
Prof. Dr. Mrs. S. S. Rathod
Head, Deptt. of Economics,
Shri Shahaji Chhatrapati
Mahavidyalaya, Kolhapur

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : *www.aadharsocial.com*        Aadhar Publications

'Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (CDLXIII) 463
ISSN : 2278-9308
March, 2024


| | | |
|---|---|---|
| 37 | भारताच्या चलनाचे विमुद्रीकरण<br>प्रा.एल. के. पवार | 170 |
| 38 | भारतीय रेल्वे क्षेत्रात थेट विदेशी गुंतवणुकीची गरज डॉ. हणमंत शहाजी सावंत | 174 |
| 39 | भारतातील वैद्यकीय पर्यटन: परकीय चलनाला चालना देणारा उद्योग<br>डॉ. सुरेश वसंत शिखरे | 178 |
| 40 | भारतीय अर्थव्यवस्था:आव्हाने आणि संधी<br>डॉ. डी. आर. धेडे | 191 |
| 41 | वस्तू आणि सेवा कर : नजीकच्या काळातील आव्हाने व समस्या<br>चिंतन नागेश पोतदार | 196 |
| 42 | भारतातील वित्तीय समावेशन<br>प्रा. सौ. एन. एस. पाटील | 199 |
| 43 | हवामान बदलाचा कृषी क्षेत्रावरील परिणाम ज्योती आप्पासाहेब माळी | 203 |
| 44 | विकसित भारत @ 2047<br>आर. बी. पाटील | 207 |
| 45 | भारतातील विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक आणि सद्यस्थिती : एक संक्षिप्त आढावा<br>प्रा. डॉ. संजय शिवाजी ओमासे | 211 |
| 46 | भारतातील मानव संसाधन विकास सहा.प्रा.सोनाली काशिनाथ गवळी | 216 |
| 47 | विकास पर्यावरण आणि शाश्वतता सहा. प्रा. सुषमा युवराज पाटील | 220 |
| 48 | भारतातील महिला सक्षमीकरण आणि महिला साक्षरता प्रा. किरण सदाशिव कांबळे | 225 |
| 49 | अमृतमहोत्सवी भारतीय अर्थव्यवस्था : एक दृष्टीक्षेप !<br>श्री. चंद्रकांत भूपाल पाटील ,प्राचार्य. डॉ.विजयकुमार पाटील | 229 |
| 50 | भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील पर्यावरणीय समस्या प्रा. वर्षा संदीप पाटील | 236 |
| 51 | नवीन शैक्षणिक धोरण आणी उच्च शिक्षणाचे आंतरराष्ट्रीयीकरण<br>डॉ. आर. डी. मांडणीकर | 241 |
| 52 | सातारा जिल्ह्यातील भूमी उपयोजन कार्यक्षमतेचा अभ्यास<br>श्री. तेजस चव्हाण ,डॉ. डी. एल. काशिद-पाटील ,श्री. गौरव काटकर | 246 |
| 53 | भारतीय अर्थव्यवस्थेची सद्यस्थिती आणि आव्हाने डॉ. विजय जालिंदर देठे | 252 |
| 54 | मौजे आगर मधील जाधव पोल्ट्री फार्म : एक आर्थिक चिकित्सक अभ्यास<br>प्रा.डॉ. प्रभाकर तानाजी माने | 256 |
| 55 | डॉ.शां.ग.महाजन यांचे ग्रंथालय आणि माहितीशास्त्र साहित्यातील येगदान<br>सौ.नीता पाटील | 261 |

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (CDLXIII) 463
ISSN : 2278-9308
March, 2024

# भारतातील मानव संसाधन विकास

सहा.प्रा.सोनाली काशिनाथ गवळी
(वाणिज्य) कला,वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज.
Mo. No-7249871978 ,Email ID-sonaligavali505@gmail.com

सारांश-

मानवी संशोधनाची रूपांतर मानवी भांडवलात करण्याची प्रक्रिया म्हणजे मानव संसाधन विकास मनुष्य बळ विकास होय. मानवी संशोधनांमध्ये देशातील लोकांच्या संख्येचा समावेश होतो,तर मानवी भांडवलात लोकसंख्येच्या ज्ञानाचा स्तर (शिक्षण व कौशल्य )व ज्ञान प्रभावीपणे वापरण्याची क्षमता (आरोग्य व स्वच्छता )यांचा समावेश होतो. देशाच्या लोकसंख्येचे रूपांतर शिक्षित प्रशिक्षित व आरोग्यवान लोकसंख्येत करण्याची प्रक्रिया म्हणजेच मनुष्यबळ विकास होय. देशातील प्रत्येक व्यक्तीस आपल्या पूर्ण क्षमतेचा वापर करता येईल इतपत विकसित करणे व तशी सहाय्यभूत परिस्थिती निर्माण करणे म्हणजे मनुष्य बळ विकास होय. शिक्षणामुळे विविध लोकसंख्येच्या अंगी विविध प्रकारची कामे करण्यासाठी कौशल्य निर्माण होतात. शिक्षण देशात उच्च-स्तरीय शाश्वत विकास साध्य करण्यासाठी एक हमखास साधन आहे. मनुष्यबळ विकासासाठी शिक्षणाबरोबरच आरोग्य हा एक महत्त्वाचा प्रमुख घटक आहे. शिक्षणामुळे प्राप्त कौशल्य आरोग्य अभावी वापरली जाऊ शकत नाही. त्यामुळे व्यक्तींचे सामाजिक- सांस्कृतिक -आर्थिक योगदान निरामय स्थिती शिवाय शक्य होत नाही. आरोग्यामुळे केवळ व्यक्ती जीवनाची गुणवत्ता सुधारते असे नाही, तर आरोग्य ही राष्ट्रवाढ व विकासाची एक व्यापक प्रक्रिया आहे.

प्रस्तावना-

आर्थिक वाढ साध्य करण्यासाठी शिक्षित प्रशिक्षित व आरोग्यवान लोकसंख्या अर्थव्यवस्थेतील उत्पादन व उत्पादकता वाढविण्यासाठी कारणीभूत ठरते. म्हणून संपूर्ण समाजाला शिक्षित प्रशिक्षित करून त्यांच्या कौशल्यांचा पुरेपूर वापर करण्यासाठी आवश्यक्य असलेली आरोग्य व्यवस्था निर्माण करणे गरजेचे आहे. अधिक गुंतागुंतीच्या बनत चाललेल्या आधुनिक भौतिक तंत्रज्ञानाला सुधारित विकसित तंत्रज्ञानाचे पाठबळ आवश्यक्य असते. सुजाण, कुशल, सुशिक्षित, आरोग्यवान,ज्ञानाधिष्ठित मानवी भांडवल निर्माण करण्यासाठी मानव संसाधन नियोजनामध्ये शिक्षण आरोग्य स्वच्छता यासारख्या घटकांच्या नियोजनाचा समावेश होतो.

उद्दिष्टे-

सदर शोध निबंध हा आधुनिक समाजात मानव संसाधन नियोजन विश्लेषण तसेच मानव संसाधन नियोजनातील अंतर्भूत घटक मांडला आहे. या शोधनिबंधात पुढील उद्दिष्टे ठरविण्यात आलेली आहेत.

1.भारतातील शिक्षण पद्धती समजून घेणे.

2.शिक्षणासाठी सरकारी धोरणे योजना व कार्यक्रम यांचा अभ्यास करणे.

3.औपचारिक अनौपचारिक आणि प्रौढ शिक्षणाचे प्रवर्तन नियम आणि पाहणी करण्यात गुंतलेल्या शासकीय व स्वयंसेवी संस्थांचा अभ्यास करणे.

4.राष्ट्रीय आरोग्य धोरणांचा अभ्यास करणे.

5.सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमांचा अभ्यास करणे.

महत्व-

1.मानवी संसाधन नियोजनांमध्ये शिक्षणामुळे नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याची क्षमता वाढीस लागते.

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (CDLXIII) 463
ISSN : 2278-9308
March, 2024

2. शिक्षण देशात उच्चस्तरीय शाश्वत विकास साध्य करण्यासाठी एक हमखास साधन आहे.
3. शिक्षणामुळे नव्या शोधांना चालना मिळते.
4. शिक्षणामुळे लोकसंख्येत व्यावसायिक व तांत्रिक प्रशिक्षण प्राप्त होते जे प्रत्येक व्यक्तीस अर्थार्जनांसाठी मदतीची असते.
5. आरोग्य सेवेची संबंधित समस्या आणि मुद्दे ते दूर करण्यासाठी प्रयत्न करणे.
6. जननी बाल सुरक्षा योजना तसेच भारतातील आरोग्य सेवा व्यवस्था राष्ट्रीय अभियान वाढीस मदत होते.

मर्यादा-

मानवी संसाधन नियोजनात आरोग्य म्हणजे केवळ रोगाची अनुपस्थिती नसून त्यामध्ये स्वतःच्या क्षमतेचा पुरेपूर वापर करता येण्याच्या क्षमतेचाही समावेश करावा. आरोग्यामध्ये व्यक्तीच्या शारीरिक मानसिक आर्थिक व सामाजिक सुस्थितीचा समावेश केला पाहिजे.

शिक्षण पद्धतीमध्ये अभियानात शिक्षक, अध्यापन, शिक्षक तयारी, व्यावसायिक विकास, पाठ्यक्रम आराखडा, मूल्यांकन पद्धतीचाआराखडा विकसित करणे, अध्यापन संशोधन याविषयीचे सर्व मुद्दे व्यापकतेने हाताळण्यावर भर देण्यात यावा.

विश्लेषण-

1. शिक्षण-

भारतीय शिक्षण पद्धती-

जन्मापासूनच बालकाची शिकण्याची प्रक्रिया सुरू होते बालकाच्या विकासाच्या अवस्था नुसार औपचारिक शिक्षणाचे विविध टप्प्यांमध्ये विभाजन केले जाते ते खालील प्रमाणे.

1. शिशु अवस्था ( जन्मापासून ५-६ वर्षापासून ११-१२ वर्षापर्यंत): पूर्व प्राथमिक शिक्षण
2. बाल्यावस्था (५-६ वर्षापासून ११-१२ वर्षापर्यंत): प्राथमिक शिक्षण
3. किशोरावस्था( ११-१२ वर्षापासून १७-१८ वर्षापर्यंत): प्राथमिक शिक्षण
4. प्रौढावस्था (१७-१८ वर्षापुढे): उच्च शिक्षण

कोठारी आयोगाच्या (१९६४-६६)शिफारशीनुसार भारत सरकारने १९६८ मध्ये पहिल्या राष्ट्रीय शिक्षण धोरणाची घोषणा केली. ज्यामध्ये १०+२+३ या शैक्षणिक संरचनेचा स्वीकार करण्यात आला. महाराष्ट्रामध्ये १०+२+३ या शैक्षणिक संरचनेचा स्वीकार १९७५ पासून करण्यात आला. त्यानुसार पहिली दहावीची परीक्षा (SSC) एप्रिल १९७५ मध्ये घेण्यात आली.+२ स्तराच्या अंमलबजावणीसाठी १९७५-७६ साली इयत्ता XI ची तर १९७६-७७ साली इयत्ता XII ची सुरुवात करण्यात आली. बारावीची (HSC) पहिली परीक्षा एप्रिल१९७७ मध्ये घेण्यात आली.२०२० NEP नुसार रचना ५+३+३+४ करण्यात आली आहे.

- शिक्षण विकासासाठी सरकारी धोरणे योजना व कार्यक्रम(**Policies, Schemes and Programmes**)-

मानव संसाधन विकास मंत्रालय (**Ministry of Human Resource Development: MoHRD**)-

- मानव संसाधन विकास मंत्रालय हे केंद्रस्तरावर शिक्षण विकासासाठी नोडल मंत्रालय म्हणून कार्य करते.
- या मंत्रालयाची स्थापना २६ सप्टेंबर १९८५ रोजी करण्यात आली. त्याची स्थापना 'भारत सरकार' (कामकाज विभागणी) नियम १९६१ मध्ये १७४ वी दुरुस्ती करून करण्यात आली.
- मानव संसाधन विकास मंत्रालय दोन विभागांच्या माध्यमातून कार्य करते.

१) शालेय शिक्षण व साक्षरता विभाग-

शिक्षणाच्या सार्वत्रिकरणातून देशातील तरुण लोकसंख्येला उत्तम नागरिक बनविणे हे या विभागाचे ध्येय आहे.

२) उच्च- शिक्षण-

देशातील उच्च शिक्षणाचा विकास हे या विभागाचे कार्य आहे.

२) आरोग्य-

आरोग्य : मनुष्यबळ विकासाचा एक महत्त्वाचा व प्रमुख घटक-

मनुष्य बळ विकासासाठी शिक्षणाबरोबरच आरोग्य हा एक प्रमुख घटक आहे. शिक्षणामुळे प्राप्त कौशल्य आरोग्य अभावी वापरली जाऊ शकत नाही.

जागतिक आरोग्य संघटना-(World health organisation: WHO)

जागतिक आरोग्य संघटना (WHO) ही संस्था आंतरराष्ट्रीय सार्वजनिक आरोग्याशी संबंधित असलेले संयुक्त राष्ट्राचे एक विशेषीकृत अभिकरण(Specialised Agency) आहे.

जागतिक आरोग्य संघटनेची उद्दिष्टे-

१) आरोग्य विषयी निकष व मापदंड निर्माण करून त्यांच्या अंमलबजावणीस प्रोत्साहन देऊन त्याची पाहणी करणे.

२) संशोधन अजेंड्यास आकार देऊन महत्त्वाच्या ज्ञानाची निर्मिती, भाषांतर व प्रसारास उत्तेजन देणे.

३) आरोग्य परिस्थितीची सतत पाहणी करणे आणि आरोग्य विषयक प्रवृत्तींचे मूल्यांकन करणे.

नियंत्रण कार्यक्रम-

१) सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम-

**Revised National Tuberculosis Control Programme: RNTCP)-१९६२**

• क्षय (Tuberculosis:TB)-हा मायक्रो बॅक्टेरियम ट्यूबर क्यू लॅसिस नावाच्या जीवाणूमुळे होणारा अति संसर्गजन्य रोग आहे जगात सर्वाधिक क्षय रुग्ण भारतात आढळतात जागतिक आरोग्य संघटनेने शिफारस केलेल्या DOTS पद्धतीच्या आधारांवर १९९२ मध्ये या कार्यक्रमाची पाहणी करून मार्च १९९७ पासून सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम सुरू करण्यात आला.

**2.राष्ट्रीय आरोग्य धोरण,२०१७-(National health policy, 2017)**

या धोरणाचा प्रमुख उद्देश सर्व विकासात्मक धोरणांमध्ये प्रतिबंधात्मक व प्रोत्साहनात्मक आरोग्य विषय काळजीचा दृष्टिकोन आणून चांगले आरोग्य आणि सुस्थितीचा आढावा घेणे.

लक्ष्ये -

१) २०२५ पर्यंत जन्माच्या वेळेचे आयुर्मान १७.५ वरून ७० पर्यंत वाढविणे.

२) २०२५ पर्यंत पाच वर्षाखालील बाल मर्त्यता २३पर्यंत कमी करणे तर २०२० पर्यंत माता मृत्यू दर १०० पर्यंत कमी करणे.

३) २०१९ पर्यंत अर्भक मृत्युदर २८पर्यंत कमी करणे.

निष्कर्ष-

१) मानवी संसाधन नियोजन आणि विश्लेषण यांच्यामध्ये शिक्षण आरोग्य व स्वच्छता या घटकांमध्ये वरीच वाढ झालेली दिसून येते.

२) शिक्षण व्यवस्थेमध्ये जास्तीत जास्त व्यावसायिक शिक्षणावर भर देण्यात आलेला आहे.

३) आरोग्य या घटकांमध्ये योजनांचा पुरेपूर वापर करण्यात आलेला आढळून येतो.

४) तसेच आरोग्य व शिक्षण पद्धतीत समतोल राखण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो.

सूचना-

शिक्षण पद्धती तसेच आरोग्य योजना यांच्या संख्येमध्ये अजून वाढ करणे गरजेचे आहे. तसेच योजना या सर्व सामान्य पर्यंत पोहोचवणे गरजेचे आहे. व्यवसायिक शिक्षणाला जास्तीत जास्त महत्त्व देणं गरजेचं आहे.

संदर्भ-

१) रंजन कोळंवे - HRD
२) HRD - Unique Academy
3) Unique Academy - योजना पुस्तक

Shikshan Samiti KII Nesari's

# TUKARAM KRISHNAJI KOLEKAR ARTS, COMMERCE AND SCIENCE COLLEGE

Nesari, Tal. Gadhinglaj, Dist. Kolhapur

## Department of Commerce

Organised

**Shivaji University Kolhapur** Sponsored

Two Day National Seminar

In collaboration with

Rajarshi Shahu Arts and Commerce College, Rukadi

Rotary Club of Atigre & Narayandas Damodar Bhandari Foundation Ichalkaranji

Knowladge Partner

Shivaji University Commerce and Management Teachers Association (SUCOMATA)

## CERTIFICATE

*This is to certify that, Prof./~~Dr.~~/Miss/~~Mrs.~~/~~Mr.~~* Sonali Kashinath Gawali

of Arts, Commerce & Science college Gadhinglaj participated

*in Two Day National Seminar on* ***Sustainable Development in Commerce and Management***

*organised on 12th and 13th January, 2024. .He/She has presented a paper entitled*

'मानव संसाधन नियोजन आणि विश्लेषण'